शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक- २ जून,१९९९.

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
. . . . . . . . . . . . . . .

विषय- सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेवून खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली च्या वर्गास ( फक्त एका तुकडीस ) इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही या अटीवर शाळा सुरु करण्यास (जून,१९९९ पासून) शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | ममता महिला बहुउद्देशिय शिक्षण संस्था, गडचिरोली. | रोरथ प्राथमिक शाळा चैतन्यनगर,नारी रोड, नागपूर | हिंदी |
| २. | चंद्रकांत यशवंत दांगट शिक्षण संस्था, वडगाव बु. ता.हवेली, जि.पुणे. | शेवंताबाई बंडोजी चव्हाण कन्या प्राथमिक शाळा धायरी गाव, ता. हवेली, जि.पुणे | मराठी |

२. सदर परवानगी शासन पत्र क्रमांक-व्हीएलएस-१०९९/(१३२)/प्राशि-३,दिनांक ४ मे, १९९९ मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. सदर शासन पत्रातील दोन संस्थांना परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थांकडून रु.२०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदर हमीपत्र आपल्या कार्यालयातील तसेच शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

यांचे कार्यालयातील संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवावे. त्याची एक प्रत शासनास माहितीसाठी सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच शासन पत्र दिनांक ४ मे, १९९९ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

( सु. वि. पाटील )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, पुणे
३. प्रशासन अधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका शिक्षण मंडळ, मिरा भाईंदर/ठाणे.
४. मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी.
५. मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी.
६. मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक
७. निवड नस्ती प्राशि-३.